नोव्हेंबर / November
शनिवार / Saturday
दि.०७ / Dt: 07
२०२६ / 2026

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

सत्य | निष्पक्ष | निर्भीड | सर्वसमावेशक

आजचा अंक ६ पाने Pages 6

३ किंमत रूपये Price 3 rupees

Jagmitra2010@gmail.com

● मा.संपादक : कृष्णा कडबाने 7030908787 ● निवासी संपादक : मकरंद जहागीरदार 9422216061, 9371591760 ● कार्यकारी संपादक : शेख बिलाल 9422404740

www.jagmitra.com

● बीड/Beed ● वर्ष १७ वे/Year 17 ● अंक १९/Issue 19 ● आरएनआय नं.एमएचएमएआर/२०११/३८८१४ /RNI.No.MAHMAR/2011/38814

दीपावली
निमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा
ए.बी.परमार
Railway contractor, Parli Vaijnath

श्रध्दा एनर्जी अॅन्ड इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.
मॉ.बागेश्वरी साखर कारखाना
वरफळ ता.परतूर जि.जालना.
दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा..!
श्री. अजय शिवाजीराव जाधव संचालक
श्री. अमित शिवाजीराव जाधव कार्यकारी संचालक
श्री. शिवाजीराव भगवंतराव जाधव चेअरमन

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा..!
-* शुभेच्छूक -*
अण्णासाहेब जाधव
जेष्ठ नेते, शिवसेना, बीड जिल्हा

दीपावली
निमित्त सर्व जनतेस
हार्दिक शुभेच्छा..!
आ.धनंजय मुंडे माजी मंत्री

07 Nov 2026 page 2_Layout 1 11/7/2026 12:57 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भीड दैनिक जगमित्र विशेष संपादकीय

बेभरवशी बाणा !

मतुमच्यावर कोणीही विश्वास ठेवणार नाहीफ, ही भावना राजकीय विरोधक, पत्रकार अशा अनेकांनी सरकारबाबत व्यक्त केलेली असेल आणि सरकारनेही त्याकडे आपल्या यशस्वी शैलीनुसार दुर्लक्ष केले असेल. पण देशाचे सर्वोच्च न्यायालयच या शब्दांत केंद्र सरकारला खडसावते तेव्हा त्याची दखल घेणे क्रमप्राप्त ठरते. ती जशी सरकारने घ्यायला हवी तशीच, विवेक शाबूत असलेल्या नागरिकांनीही घ्यावयास हवी. त्यासाठी हे प्रकरण समजून घ्यायला हवे. आतापर्यंत विद्यमान सरकारला अनेकदा न्यायालयीन शब्दछडीचा प्रसाद मिळाला. मग मुद्दा मबुलडोझर न्यायाफ्चा असेल अथवा मजामीन हा नियम, तुरुंगवास हा अपवादफ हा सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा घालून दिलेला नियम असेल. सरकारने विरोधक वा सव्यसाची पत्रकारांस द्यावी तशी वागणूक न्यायालयासही दिल्याचे अनेक प्रसंग घडले. परंतु न्यायालयाने सरकारला मतुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही,फ अशा शब्दांत खडसावावे इतकी वेळ आली नव्हती. आता तेही झाले. देशाच्या आर्थिक राजधानीत, मुंबईत अर्थमंत्री निर्मला सीतारामन परदेशी गुंतवणूकदारांस आकृष्ट करण्याचे प्रयत्न करत असताना त्याच शहरातील उच्च न्यायालय शहराच्या महापौर आणि सत्ताधार्यांस नि:संदिग्ध शब्दांत ठणकावते आणि तिकडे राजधानी दिल्लीत सर्वोच्च न्यायालय सरकारच्या विश्वासार्हतेची अब्रू चव्हाट्यावर आणते. या दोन घटना सद्य:स्थितीचा आरसा ठरतात. सर्वोच्च न्यायालयातील मुद्दा वेदांत ही भारतीय आणि रव्वा ऑइल ही सिंगापूरमध्ये स्थापन झालेली कंपनी या दोन कंपन्या आणि भारत सरकार यातील मतभेदांचा आहे. तसाच तो त्या मतभेदांवर निघालेल्या न्यायालयीन तोडग्याकडे सरकार कसे दुर्लक्ष करत आले त्याचाही आहे. याचा परिणाम असा की गेली तब्बल २६ वर्षे हे प्रकरण सरकारच्या आडमुठेपणामुळे निकालात निघू शकलेले नाही. ते पुन्हा सर्वोच्च न्यायालयात आले असता न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला वरील शब्दांत खडसावले. यात भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा प्रश्न असल्याने हे प्रकरण समजून घ्यायला हवे.


झाले असे की केंद्र सरकारने १९९४ सालच्या ऑक्टोबरात कृष्णा-गोदावरी खोर्यातील रव्वा येथे खनिज तेल क्षेत्र विकसित करण्यासाठी वर उल्लेखलेल्या कंपनी समूहाशी करार केला. हा करार तर झाला; पण त्यानुसार हाती लागलेल्या ऊर्जा स्रोतांच्या विक्रीतून नफा झाल्यास तो कसा वितरित करावयाचा याबाबत मतभेद झाले. त्यास सिंगापूर-स्थित कंपनीने मलेशियातील लव-ादासमोर आव्हान दिले. तशी तरतूद मूळ करारात होती आणि गुंतवणूकदार कंपनी सिंगापुरातील असल्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर दाद मागितली जाणे अनपेक्षित नव्हते. त्यावर २००४ सालच्या ऑक्टोबरात मलेशियन लवादाने अंतरिम निकाल दिला आणि त्यानंतर १२ वर्षांनी २०१६ साली ऑक्टोबरात अंतिम निकाल देऊन हे प्रकरण निकाली काढले गेले. केंद्र सरकारने या वादात सदर सिंगापुरी कंपनीकडून ९.९ कोटी डॉलरची नुकसानभरपाई मागितली होती. ती या लवादाने फेटाळली. त्यास मलेशियाच्या उच्च न्यायालयातही आव्हान दिले गेले. तेही त्या न्यायालयाने फेटाळले. उभयतांनी या कंपन्या भारताच्या मतेल आणि नैसर्गिक वायू महामंडळाफ्स काहीही अधिक देणे लागत नाहीत, असा निवाडा दिला. त्यास केंद्र सरकारने दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यात लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे दिल्ली उच्च न्यायालयानेही केंद्राची मागणी धुडकावून लावली. दिल्ली उच्च न्यायालयात सरकारने भलताच दावा केला. लवादाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची अंतिम मुदत संपुष्टात आल्याचे कारण सरकारने पुढे केले. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्या. जसमित सिंग यांनी सरकारचा हा दावाही अमान्य केला. दरम्यान, २०१४ साली केंद्राने रव्वा ऑइल कंपनीकडे ६.४० कोटी डॉलर आणि त्यांची भागीदार कंपनी असलेल्या मवेदांतफ्कडे ९.९ कोटी डॉलर्स नुकसानभरपाई मागितली. ती अर्थातच अमान्य झाली. वास्तविक दिल्ली उच्च न्यायालयात फटका खाल्ल्यानंतर तरी केंद्र सरकारने झाले तितके पुरे असे म्हणत प्रकरण सोडून द्यायला हवे होते. पण असे थांबणे केंद्र सरकारला मंजूर नसावे. दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशास केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. उच्च न्यायालयाच्या आदेशात बदल करण्याची काहीही गरज नाही, असा निवाडा त्यावर सर्वोच्च न्यायालयाने दिला आणि तेथे न्या. पारडीवाला आणि न्या. मनमोहन यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. ममउच्च न्यायालयाच्या निकालात कोणतीही त्रुटी नाही. कायद्यांचा अर्थ लावण्याबाबत तर अजिबातच काही चूक नाहीफ्फ असे अत्यंत स्पष्टपणे नमूद करून न्यायमूर्तीद्वयांनी या कंपन्यांची देणी का तुम्ही लांबवत आहात असे सरकारला विचारले. ममअंमलबजावणीच्या वेळेस तुम्ही निवाडा कसे मानत नाहीफ्फ, हा न्यायालयाचा सरकारला प्रश्न. तो विचारताना युक्तिवाद करून वेळ काय वाया घालवता, असेही सरकारला न्यायालयाने खडसावले. प्रश्न तेथे संपत नाहीत. भारत सरकारकडून आंतरराष्ट्रीय पातळीवर गुंतवणूक आकर्षित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचा उल्लेख करत न्यायाधीशांनी सरकारच्या धोरणांबाबत प्रश्न उपस्थित केले. ममतुम्ही आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांस आम्ही यंव करू, त्यंव करू असे सांगता आणि प्रत्यक्षात वैकल्पिक लवादाच्या निकालाकडे दुर्लक्ष करताः तुमच्यावर कोणी विश्वास ठेवणार नाहीफ्फ, इतक्या स्वच्छपणे सरकारची कानउघाडणी केली. आता यानंतर तरी सरकार लवाद आणि न्यायालयीन आदेशाची अंमलबजावणी करते किंवा काय हे दिसेलच. पण जे झाले त्यामुळे सरकारी दफ्तरदिरंगाई आणि आडमुठी नोकरशाही आपल्या विकासाच्या आड कशी येत असते ही बाबही पुन्हा उजेडात येते. सदरहू प्रकरण ३२ वर्षांपासून अनिर्णित आहे. त्यातील पहिल्या लवादाचा निवाडा येऊनही २२ वर्षे सरली. या प्रकरणी लवादाने अंतिम निवाडा दिला त्यासही १० वर्षे उलटून गेली. तरी प्रकरणाचे भिजत घोंगडे तसेच्या तसेच. या पार्श्वभूमीवर मलेशियन लवादाची तत्परता वाखाणण्याजोगी म्हणायची. या लवादासमोर हे प्रकरण २००४ सालच्या ऑगस्ट महिन्यात सादर झाले आणि १२ ऑक्टोबरला तेथे कंत्राटाबद्दलचा अंतरिम निवाडा लागलाही. त्यावरील अपिलावर मलेशियन न्यायालयानेही पाच वर्षांत अंतिम निर्णय दिला. त्यातूनही काही होत नाही असे दिसल्यावर या कंपन्यांनी पुन्हा लवादाचा दरवाजा ठोठावला. त्यासाठी नवीन लवाद स्थापन केला गेला. त्याचा निकाल २०१६ सालच्या ऑक्टोबरात आला. तरीही भारत सरकारने त्याची अंमलबजावणी करणे हे ना ते कारण पुढे करत टाळले.

दीपावलीच्या पार्श्वभूमीवर परळीतील जत्रा मैदान अन् मोंढा मार्केटला अग्निशमन कवच द्या!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी शहरातील राणी लक्ष्मीबाई टॉवर चौकातील शिंदे शू मार्टला शुक्रवारी (दि.६) सकाळी लागलेल्या आगीत दुकानातील चप्पल, बूट व इतर साहित्य जळून खाक झाले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर दीपावली सणाच्या काळात व्यापारी व नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगर परिषदेने विशेष खबरदारी घ्यावी, अशी मागणी शिवसेना नेते अभयकुमार उर्फ पप्पू अण्णा ठक्कर यांनी केली आहे.

दीपावलीनिमित्त नाथ टॉकीज रोडवरील जत्रा मैदान येथे फटाक्यांची दुकाने थाटण्यात आली आहेत. तर मोंढा मार्केट येथील कृषी उत्पन्न



शिवसेना नेते, माजी नगराध्यक्ष अभयकुमार ठक्कर यांची मागणी

बाजार समिती परिसर हे शहरातील संपूर्ण बाजारपेठेचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथे नागरिक व व्यापाऱ्यांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी जत्रा मैदान येथे तसेच मोंढा मार्केट येथे प्रत्येकी एक अग्निशमन दलाची गाडी दीपावली संपेपर्यंत तैनात ठेवावी, अशी मागणी ठक्कर यांनी केली आहे. तसेच आग लागल्याची माहिती मिळताच संबंधित परिसरातील वीजपुरवठा महावितरणने तातडीने खंडित करावा. नगर परिषद प्रशासन व महावितरणने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन व्यापारी, फटाका विक्रेते आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन शिवसेना नेते अभयकुमार उर्फ पप्पू अण्णा ठक्कर यांनी केले आहे.

बीड व लातूर रेल्वे स्थानकांसाठी परळीहून एसटी बससेवा सुरू करा!

बीड-पुणे रेल्वे व लातूर-मुंबई विशेष रेल्वेच्या वेळापत्रकानुसार बस फेऱ्यांचे नियोजन करण्याची चेतन सौंदळे यांची मागणी

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

परळी वैजनाथ व परिसरातील रेल्वे प्रवाशांच्या सोयीसाठी परळी येथून बीड व लातूर रेल्वे स्थानकांपर्यंत तसेच तेथून परळी येथे परतण्यासाठी नियमित एसटी बससेवा सुरू करावी, अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष चेतन सौंदळे यांनी बीड विभागीय नियंत्रक व परळी आगार व्यवस्थापक श्री.सिध्दार्थ सोनवणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.बीड-पुणे रेल्वेच्या येण्या-जाण्याच्या वेळापत्रकानुसार तसेच लातूर(हरंगुळ)-हडपसर व लातूर -मुंबई विशेष रेल्वेच्या प्रस्थान व आगमनाच्या वेळेनुसार एसटी महामंडळाने स्वतंत्र बसफेऱ्यांचे नियोजन करावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे.परळी व परिसरातील अनेक नागरिक नोकरी, व्यवसाय, शिक्षण, वैद्यकीय उपचार व इतर कामांसाठी रेल्वेने प्रवास करतात मात्र बीड व लातूर रेल्वे स्थानकांपर्यंत जाण्यासाठी आणि रेल्वेने प्रवास करून परत परळी येथे येण्यासाठी



पुरेशी सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. परिणामी त्यांना आर्थिक भुर्दंड व वेळेचा अपव्यय सहन करावा लागत आहे.विशेषतः बीड-पुणे रेल्वेच्या आगमन व प्रस्थानाच्या वेळांशी सुसंगत परळी-बीड व बीड-परळी बससेवा, तसेच लातूर-मुंबई विशेष रेल्वेच्या वेळापत्रकानुसार परळी-लातूर व लातूर-परळी बसफेऱ्या सुरू करणे आवश्यक आहे. रेल्वे प्रवाशांना स्थानकावर वेळेत पोहोचता यावे आणि रेल्वेने आलेल्या प्रवाशांना परळी येथे सुरक्षितपणे परतता यावे, अशा पद्धतीने बससेवेचे नियोजन करावे, असेही सौंदळे यांनी नमूद केले आहे.परळी वैजनाथ हे महत्त्वाचे धार्मिक, व्यापारी व वाहतूक केंद्र असून या बससेवेचा परळी शहरासह परिसरातील ग्रामीण भागातील हजारो नागरिकांना लाभ होणार आहे. त्यामुळे एसटी महामंडळाच्या बीड विभागाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन प्रवाशांच्या हितासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.रेल्वे आणि एसटी महामंडळ यांच्यात समन्वय साधून प्रवाशांच्या सोयीसाठी ही बससेवा तातडीने सुरू करावी, अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषदेचे अध्यक्ष चेतन सौंदळे यांनी केली आहे.

चाटोरीत शेतकरी कुटुंबीयांना किराणा किटचे वाटप



चाटोरी/गंगाखेड

सध्या दुष्काळजन्य परिस्थितीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना आधार देण्यासाठी 'स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेस'च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. गंगाखेड तालुक्यातील चाटोरी येथे दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना जीवनावश्यक वस्तूंच्या किराणा किटचे वाटप करण्यात आले. स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेस नेहमीच समाजातील अशा कठीण प्रसंगात आणि संकटाच्या काळात विविध सामाजिक उपक्रम राबवून मदतीचा हात पुढे करत असते. याच सामाजिक जाणिवेतून चाटोरी येथील गरजू शेतकरी कुटुंबांना किराणा किटचे वाटप करण्यात आले. या मदत वाटप सोहळ्याप्रसंगी चाटोरी गावचे सरपंच अण्णासाहेब किरडे, पोलीस पाटील सचिन सर, स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेसचे रिजनल मॅनेजर योगेश श्रीराव सर तसेच कंपनीचे इतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर बडे यांनी केले. संस्थेच्या या संवेदनशील उपक्रमामुळे दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला असून, ग्रामस्थांकडून स्वमान फायनान्शियल सर्व्हिसेसच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

शेवटच्या पानावरून...

विकासकामांना गती

बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे सर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष अय्युब भैय्या पठाण, नगरसेवक अनंतराव इंगळे,अझीझ भाई कच्छी, इस्माईल दादा,प्रितेशजी तोतला, हाजी बाबा,युवक अध्यक्ष एजाज भाई शेख,जावेद कुरेशी, राजू भाई मॅकेनिक,अझीम नवाब,बळीराम नागरगोजे यांच्यासह अनेक मान्यवर व सहकारी उपस्थित होते. यादरम्यान आमचे सहकारी मेहबूब भाई कुरेशी यांच्या निवासस्थानी देखील सदिच्छा भेट देऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. निवडणुकीतील जय-पराजय हा राजकारणाचा भाग असतो; मात्र नागरिकांना दिलेला शब्द आणि विकास-प्रती असलेली बांधिलकी ही कायम असते!

....

प्लास्टिकमुक्तीचा जागर

सौ. रेखा मंत्री, सौ. सुरेखा मंत्री, सौ. पद्मा तोष्णीवाल, सौ. ममता तोष्णीवाल, सौ. शिल्पा तोष्णीवाल, सौ. स्नेहल तोष्णीवाल, सौ. सपना तोष्णीवाल, सौ. सुवर्णा तोष्णीवाल, सौ. पूनम तोष्णीवाल, सौ. भाग्यश्री तोष्णीवाल व सौ. श्वेता तोष्णीवाल यांच्यासह महिला सदस्यांनी सहभाग नोंदविला.

....

रेशन बंदीची कुऱ्हाड!

कुटुंबांतील तरुण रोजगाराच्या शोधात शहरांकडे जात आहेत. कोणी खासगी कंपनीत अल्प पगारावर नोकरी करतो, तर कोणी कष्टाने आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मात्र, मुलगा नोकरीला आहे म्हणून गावात राहणारे वृद्ध आई-वडील, अल्पभूधारक शेतकरी आणि कुटुंबातील अन्य सदस्य आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले, असे सरसकट कसे मानता येईल? आजच्या महागाईच्या काळात नोकरी करणाऱ्या तरुणावर स्वतःचा संसार सांभाळण्यासोबतच वृद्ध आई-वडिलांची जबाबदारीही असते. अशा परिस्थितीत केवळ मुलाच्या आयकर विवरणपत्राचा आधार घेऊन संपूर्ण कुटुंबाचे रेशन बंद करणे कितपत योग्य आहे? असा संतप्त सवाल पत्रात करण्यात आला आहे. मात्र पात्र लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीचा विचार न करता घेतलेले असे निर्णय अनेक गरजू कुटुंबांना अन्नसुरक्षेपासून वंचित ठेवू शकतात.

शेतकरी उत्पादक कंपनी म्हणजे धनाढ्यांची कंपनी नव्हे!

शेतकरी उत्पादक कंपन्या या शेतकऱ्यांना संघटित करून शेतीमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे, उत्पादन खर्च कमी करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे या उद्देशाने कार्यरत असतात. अशा कंपनीचा संचालक असणे म्हणजे संबंधित व्यक्ती करोडपती किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. कारण कंपनीच्या कागदोपत्री व्यवहारांचा आणि संचालकाच्या वैयक्तिक आर्थिक परिस्थितीचा गोंधळ करू नये. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी कार्यरत असलेल्या कंपनीतील पदाला सरसकट संपन्नतेचा निकष मानून पात्र कुटुंबांचे अन्नधान्य बंद करणे अन्यायकारक असल्याचे मत जे.डी. शाह यांनी व्यक्त केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे मागणी

या गंभीर प्रश्नाची दखल घेऊन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्याकडे निवेदनाद्वारे विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये बंद करण्यात आलेल्या रेशन धान्याच्या प्रकरणांची तातडीने फेरतपासणी करावी, संबंधित कुटुंबांच्या प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीची पडताळणी करावी, केवळ शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालकपद किंवा आयकर विवरणपत्र भरण्याच्या कारणावरून पात्र लाभार्थ्यांचे धान्य बंद करू नये आणि निकषांनुसार पात्र असलेल्या कुटुंबांचे रेशन तात्काळ पूर्ववत सुरू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. पत्रात शेवटी म्हटले की शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. मात्र, अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करताना पात्र आणि गरजू कुटुंबांना त्याची शिक्षा मिळता कामा नये. एकीकडे शासन गरिबांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवित असल्याचा दावा करते, तर दुसरीकडे कागदोपत्री निकषांच्या आधारे एखाद्या वृद्ध आई-वडिलांच्या ताटातील अन्नच बंद होत असेल, तर अशा प्रक्रियेचा मानवी दृष्टिकोनातून पुनर्विचार होणे आवश्यक आहे. रेशन हा गरिबांच्या जगण्याचा आधार आहे; तो केवळ सरकारी आकडेवारीचा विषय नाही. दुष्काळाने आधीच होरपळ-लेल्या शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य कुटुंबांना दिलासा देण्याची गरज असताना त्यांच्या तोंडचा घास हिरावला जाणे हा केवळ रेशनचा प्रश्न नसून सामाजिक न्याय आणि मानवी संवेदनशीलतेशी निगडित विषय आहे. पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत हा प्रश्न सातत्याने शासनदरबारी मांडत राहणार असून, बंद करण्यात आलेले पात्र कुटुंबांचे रेशन पूर्ववत सुरू करण्यासाठी बीड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी प्रामाणिक प्रयत्न करावा अशी अपेक्षा समाजसेवक जे.डी. शाह यांनी व्यक्त केली आहे.

....

महागाई भत्ता अदा!

दिवाळीपूर्वीच देण्यात आले आहे. यामध्ये वसुली विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ३८ हजार ७६८ रुपये, अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ८७ हजार ५७२ रुपये आणि विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांचे १ लाख ६८ हजार ८६३ रुपये वेतन, पाणीपुरवठा ५ लक्ष ७६ हजार ८२८ रुपये, जेसीबी ऑपरेटर ४७००० रुपये वेतन अदा करण्यात आले आहे.तसेच नागरी उपजीविका अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे १ लाख ३४ हजार ४०० रुपये वेतनही अदा करण्यात आले आहे.सर्वच कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दिवाळीच्या सणापूर्वीच वेतन मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना सणाचा आनंद साजरा करण्यासाठी आर्थिक मदत झाली आहे. नगरपरिषदेच्या या निर्णयाचे कर्मचारी वर्गातून स्वागत होत आहे. या बद्दल सर्वच कर्मचाऱ्यांनी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजा खान पठाण, बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे, स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ताताई कराड, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई गित्ते, महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, मुख्याधिकारी त्र्यंबक कांबळे, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांचे आभार व्यक्त केले आहेत.

नगरपरिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यापासून वेतन नियमितच!

परळी वैजनाथ शहराची मध्यवर्ती संस्था असलेल्या नगर परिषदेचे कामकाज हे संपूर्ण समन्वयातून चालवण्याचा प्रयत्न नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली नवीन नियमक मंडळांनी केलेला आहे. शहर विकासाच्या अथक प्रयत्नांबरोबरच प्रशासकीय कामकाजातील सुसूत्रता, नियमितता, पारदर्शकता, सेवा सुविधा, कामकाजात सुलभता आणण्यासाठीही सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. परळी नगर परिषदेवर नवीन नियमक मंडळ आल्यानंतर व नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार घेतल्यापासून आजतागायत कर्मचारी वेतन, दैनंदिन खर्च तजवीज , कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन हे नियमितच आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी १३ मे २०२५ रोजी पदभार स्वीकारल्यानंतर १२ मे २०२६ पर्यंतच्या कालावधीतील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ४ कोटी २ लाख रुपये वेतन अदा करण्यात आले. तसेच १३ मे ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीतील १ कोटी ८५ लाख २२ हजार ५८० रुपये वेतन देण्यात आले आहे. नगरपरिषदेकडून केवळ कंत्राटीच नव्हे, तर कायमस्वरूपी कर्मचारी, सेवानिवृत्त कर्मचारी आणि इतर विभागांतील कर्मचाऱ्यांच्या नियमित वेतनालाही सातत्याने प्राधान्य देण्यात आलेले आहे.

कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन तसेच थकीत महागाई भत्ता रक्कमही अदा

याशिवाय, परळी नगरपरिषदेतील कायमस्वरूपी कार्यरत कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनाही दिवाळीपूर्वी मोठा दिलासा देण्यात आला आहे. या दोन्ही कर्मचारी वर्गाचे ऑक्टोबर २०२६ महिन्याचे वेतन अदा करण्यात आले असून, कर्मचाऱ्यांची प्रलंबित असलेली २४ लाख रुपयांची महागाई भत्त्याची थकबाकीही प्रदान करण्यात आली आहे.एकंदरीतच कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपीव सेवानिवृत्तकर्मचाऱ्यांचेवेतन अदा करण्यात आल्याने परळी नगरपरिषदेकडून सर्वअधिकारी-कर्मचाऱ्यांचीदिवाळीगोड झाली असून या निर्णयाचे कर्मचारी वर्गातून स्वागत होत आहे.

जाहिर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भोकर यांचे न्यायालयात इतर किरकोळ फौजदारी
अर्ज क्र. १७१/२०२६

गणपत पोशट्टी उटणूरवाड वि. ग्रामसेवक/निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळढव

जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिमियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- **गणपत पोशट्टी उटणूरवाड,** वय- ६० वर्षे, धंदा-शेती, रा.पिंपळढव ता. भोकर जि. नांदेड

---------- विरुध्द----------

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/ग्रामपंचायत अधिकारी (जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी), ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळढव ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- **जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३)** अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञां मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची/यांचा मुलगी/मुलगा **प्रियंका पि.गणपत उटणूरवाड, रा.पिंपळढव ता. भोकर जि. नांदेड हीचा जन्म दिनांक ३०/०५/२०२१ रोजी मौजे पिंपळढव, ता. भोकर जि. नांदेड** येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक २६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, भोकर

जाहिर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भोकर यांचे न्यायालयात इतर किरकोळ फौजदारी
अर्ज क्र. १८२/२०२६

एकनाथ पि. एचफोर भोसले वि. ग्रामसेवक/निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (मेट)

जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिमियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- **एकनाथ पि.एचफोर भोसले,** वय- २५ वर्षे, धंदा- मजुरी, रा.सावरगाव (मेट तांडा) ता. भोकर जि. नांदेड

---------- विरुध्द----------

गैरअर्जदार :- ग्रामसेवक/ग्रामपंचायत अधिकारी (जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी), ग्रामपंचायत कार्यालय, सावरगाव (मेट) ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञां मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची/यांचा मुलगी/मुलगा दिपाली पि. एकनाथ भोसले, रा. सावरगाव (मेट तांडा) ता. भोकर जि. नांदेड हीचा जन्म दिनांक १४/११/२०२३ रोजी मौजे सावरगाव (मेट तांडा), ता. भोकर जि. नांदेड येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक २६/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, भोकर

जाहिर प्रगटन

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, भोकर यांचे न्यायालयात इतर किरकोळ फौजदारी
अर्ज क्र. २५३/२०२६

सय्यद जाफर पि.सय्यद हमीद वि.निबंधक (जन्म आणि मृत्यु) ग्रामिण कार्यालय, भोकर

जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिमियम, १९६९ चे १३(१)(३) अंतर्गत अर्ज

अर्जदार :- **सय्यद जाफर पि.सय्यद हमीद,** वय- ३० वर्षे, धंदा-मंजुरी, रा.संभाजी नगर तामसा, ता. हदगाव जि. नांदेड

---------- विरुध्द----------

गैरअर्जदार :- निबंधक (जन्म-मृत्यू), ग्रामिण रूग्णालय भोकर ता. भोकर जि. नांदेड

प्रकरण :- **जन्म आणि मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ चे १३(१)(३)** अंतर्गत अर्ज

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी विधिज्ञां मार्फत जन्म व मृत्यु नोंदणी कायदानुसार अर्ज दाखल केला असून त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार यांची/यांचा मुलगी/मुलगा **सय्यद जाफर पि.सय्यद हमीद, रा.संभाजी नगर, तामसा, ता.हदगाव, जि.नांदेड हीचा जन्म दिनांक २५/०२/२०२४ रोजी मौजे पिंपळढव, ता. भोकर जि. नांदेड** येथे जन्म झाला. गैरअर्जदार कार्यालयाने दप्तरी नोंद घेण्या बाबतचा आदेश व्हावा यासाठीचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या बाबत कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी आपला आक्षेप अथवा उजर हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात लेखी स्वरुपात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण घेवून पुढील आदेश करण्यात येईल.

आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

आदेशावरुन,
सहाय्यक अधिक्षक
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालय, भोकर

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२८ वा दीक्षांत समारंभ
जाहिर प्रकटीकरण

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ दिनांक २०/११/२०२६ रोजी विद्यापीठाच्या सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात सकाळी १०.०० वाजता आयोजीत करण्यात आला आहे. दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल तथा विद्यापीठाचे माननीय कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा हे भुषविणार आहेत. महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषि मंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती मा. ना. श्री. दत्तात्रय भरणे हे दीक्षांत समारंभास सन्माननिय अतिथी म्हणून राहणार असून विद्यापीठाचे माननीय कुलगुरु प्रा. (डॉ.) इन्द्र मणि हे मान्यवरांचे स्वागत करून विद्यापीठाच्या प्रगती अहवालाचे वाचन करतील.

दीक्षांत समारंभात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध विद्याशाखेतील पदवी, पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवी पूर्ण करणाऱ्या स्नातकांना पदवी अनुग्रहीत करण्यात येणार आहे. पदवी अनुग्रहीत करण्यात येणा-या स्नातकांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होणार आहे. दीक्षांत समारंभाच्या यादीत नाव असणाऱ्या स्नातकांनीच कार्यक्रमास उपस्थित राहावे तसेच त्यांनाच दीक्षांत दिंडीत सहभागी होण्याची परवानगी दिली जाईल. सदरील समारंभाचे थेट प्रसारण विद्यापीठाच्या युटूब https://www.youtube.com/@VNMKV यावर पहाता येईल. दीक्षांत समारंभास उपस्थित स्नातकांना समारंभानंतर पदवी प्रमाणपत्रे देण्यात येतील व उर्वरीत स्नातकांना त्या दिवशी त्यांच्या संबंधीत महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात येतील.

सर्व स्नातकांना हार्दिक शुभेच्छा

पुरभा काळे, कुलसचिव

महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

विष्णू निवृत्ती कदम
(संपादक जालना, आवृत्ती), ९४२२९९१०३२, ७३८५८९०४४४

PRGI.No.- MHMAR/25/A2848

जालना | शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ | पान ३

ओबीसी, ईबीसी व डीएनटी विद्यार्थ्यांसाठी पीएम यशस्वी शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाइन

जालना/जिमाका

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी ओबीसी, ईबीसी व डीएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'पीएम यशस्वी प्री-मॅट्रिक व पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती' योजनांची अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. या योजनांसाठी विद्यार्थ्यांनी नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल तसेच महाडीबीटी २.० (२.०) पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत.

प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इयत्ता नववी व दहावीमध्ये शिकणाऱ्या ज्या मुला-मुलींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करावेत.

पालकांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या इयत्ता नववी व दहावीतील मुलींनी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेसाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत. तसेच इयत्ता पाचवी व आठवीतील मुलींचे शिष्यवृत्ती अर्जही पूर्वीप्रमाणे सावित्रीबाई फुले योजनेअंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरता येतील. याशिवाय जिल्हा परिषद माध्यमिक शाळांमधील व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, तसेच सैनिकी शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता अशा योजनांचे अर्ज महाडीबीटी पोर्टलवर पूर्ववत भरता येणार आहेत. पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचे नवीन अर्ज केवळ एनएसपी पोर्टलवर भरावेत.

जालना जिल्ह्यात चारा टंचाईवर मात करण्यासाठी जालना जिल्हा प्रशासनाचे नियोजन

जिल्ह्यात २.६५ लाख मे. टन चारा उत्पादनाचे उद्दिष्ट

दुष्काळीपार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पशुधनासाठी संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागामार्फत विविध उपाययोजनांचे नियोजन करण्यात आले आहे. चारा उत्पादन वाढविणे, उपलब्ध चाऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे, पशुपालकांना पर्यायी चारा उत्पादन पद्धतींचे मार्गदर्शन करणे आणि पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, यावर विशेष भर देण्यात येत आहे. या उपाययोजनांच्या माध्यमातून जुलै २०२७ पर्यंत निर्माण होऊ शकणारी चारा टंचाई कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. जिल्ह्यातील २१ व्या पशुगणनेनुसार एकूण ६ लाख ३२ हजार ९१४ पशुधन आहे. यामध्ये ३ लाख ३० हजार २३४ मोठी जनावरे, ४५ हजार ३२ लहान जनावरे, तर २ लाख ५७ हजार ६४८ शेळ्या व मेंढ्यांचा समावेश आहे. या पशुधनासाठी दररोज २ हजार ३७४ मेट्रिक टन चारा आवश्यक आहे. सध्या जिल्ह्यात १ लाख ३२ हजार ९४४ मेट्रिक टन चारा उपलब्ध असून, जुलै २०२७ पर्यंत ६ लाख ४० हजार ९८० मेट्रिक टन चाऱ्याची आवश्यकता अपेक्षित आहे. त्यामुळे संभाव्य चारा तूट ५ लाख ८ हजार ३६ मेट्रिक टन इतकी असल्याचा विभागाचा अंदाज आहे.

चारा उत्पादन वाढीसाठी बियाणे वाटप

चारा टंचाईवर मात करण्यासाठी सन २०२६-२७ मध्ये विविध योजनांच्या माध्यमातून चारा बियाणे वाटप करण्यात येत आहे. जिल्हा वार्षिक योजना, गाळपेरा क्षेत्र आणि सिंचन सुविधा असलेल्या क्षेत्रांमध्ये चारा लागवडीला प्रोत्साहन देण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत एकूण ९ हजार ७८८ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून, ३ हजार ९९८.०५ हेक्टर क्षेत्रावर चारा लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून २ लाख ६५ हजार ३८६ मेट्रिक टन चारा उत्पादन अपेक्षित आहे. या उपक्रमांतर्गत शुगर ग्रेझ, हायब्रीड फॉडर बाजरा, मॅक्स सायलेज आणि स्वीट सोरघम या चारा पिकांच्या बियाण्यांचे वाटप करण्यात येत आहे. गाळपेरा आणि सिंचनाची सुविधा उपलब्ध असलेल्या क्षेत्रांमध्ये चारा लागवडीवर भर देण्यात आला आहे.

जालन्यात १ लाख ४० हजारांच्या दोन मोटारसायकली जप्त

जालना/ज्ञानेश्वर साळुंके

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने धडक कारवाई करत मोटार सायकल चोरी प्रकरणातील एका आरोपीसह विधीसंघर्षग्रस्त बालकाला जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून एकूण १ लाख ४० हजार रुपये किमतीच्या दोन मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत.

जालना जिल्ह्यात मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे निर्देश पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधू यांनी दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी विशेष पथक तयार केले. तपासादरम्यान गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, अजय एकनाथ टेकाळे (वय १८, रा. हिंदनगर, जालना) याच्याकडे चोरीची शाईन मोटारसायकल आहे. पोलिसांनी नवीन मोंढा परिसरातील हॉटेल बकासुर बायपास रोड येथून त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याने ती गाडी चोरीची असल्याचे कबूल केले. त्याच्याकडून ९०,०००/- रुपये किमतीची शाईन मोटारसायकल जप्त करण्यात आली (पोलीस स्टेशन जाफ्राबाद गु.नं. ३३६/२०२६ कलम ३०३(२) बीएनएस).



अधिक चौकशी केली असता, ही गाडी त्याने एका विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून खरेदी केल्याचे समोर आले. पोलिसांनी दोघांकडे अधिक तपास केला असता, त्यांनी ५०,०००/- रुपये किमतीची आणखी एक काळ्या रंगाची पल्सर मोटारसायकल काढून दिली. ही पल्सर गाडी भोकरदन पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातील (गु.नं. १२६/२०२६ कलम ३०३(२) बीएनएस) चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. दोन्ही आरोपींना जाफ्राबाद पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई करणारे पथक:ही कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी (भोकरदन) श्री. नितीन कटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक पंकज जाधव, पोउपनि राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, दिपक घुगे, सागर बाविस्कर, धिरज भोसले आणि सोपान क्षीरसागर यांनी केली आहे.

'मिशन लक्ष्यवेध' योजनेंतर्गत जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्राची स्थापना

जालना/जिमाका

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'मिशन लक्ष्यवेध' या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत जालना येथे ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारासाठी जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. या केंद्रासाठी पात्र क्रीडा मार्गदर्शकाची नियुक्ती करण्यात येणार असून, इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले आहेत.

या योजनेंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रतिभा विकास केंद्र कार्यान्वित करण्यात येत आहे. त्यानुसार जालना जिल्ह्यात ॲथलेटिक्स क्रीडा प्रकारासाठी पात्र उमेदवाराची क्रीडा मार्गदर्शक म्हणून नियुक्ती करण्यात येणार आहे. या पदासाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी आवश्यक असून, बी.पी.एड., एम.पी.एड. किंवा क्रीडा विज्ञानातील पदवीधारकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. तसेच एनएसएनआयएस डिप्लोमा इन कोचिंग (ॲथलेटिक्स) किंवा समतुल्य अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचा लेव्हल-१ कोर्स किंवा सात ते आठ आठवड्यांचा एनएसएनआयएस प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केलेले उमेदवारही पात्र असतील. उमेदवाराला राज्यस्तरावर किमान एक वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव असणे आवश्यक आहे. राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचा अनुभव असलेल्या प्रशिक्षकांना प्राधान्य देण्यात येणार आहे. उमेदवाराचे वय २१ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असावे. मराठी भाषेचे ज्ञान अनिवार्य असून इंग्रजी भाषेचे ज्ञान असल्यास प्राधान्य दिले जाणार आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावर पदक प्राप्त खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल. खेळाडूंच्या प्रगतीची नोंद ठेवणे, अहवाल तयार करणे आणि डाटा ट्रॅकिंगसाठी मूलभूत संगणक कौशल्य आवश्यक आहे. तसेच शासनमान्यताप्राप्त डॉक्टरांकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यालयीन वेळेत विहित मुदतीत सादर करावेत. या जाहिरातीची जिल्ह्यातील प्रमुख दैनिक वृत्तपत्रे तसेच प्रसारमाध्यमांमध्ये व्यापक प्रसिद्धी देण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केले आहे.

जालन्यात घरफोडीचा गुन्हा उघडकीस; ९,३५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, कदीम जालना पोलिसांची कामगिरी

जालना/ज्ञानेश्वर साळुंके

कार डेकोरच्या दुकानाचे कुलूप तोडून चोरी करणाऱ्या आरोपीला जेरबंद करत कदीम जालना पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या कारवाईत पोलिसांनी ९,३५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जुना जालना येथील एमएसईबी रोड, मिर्झासाब दर्गा चौकाजवळ असलेल्या कार डेकोरच्या दुकानात १ नोव्हेंबर रोजी रात्री चोरी झाली होती. २ नोव्हेंबरच्या पहाटे दुकानाचे कुलूप तोडून आतून ४०७६ गेजचे स्पीकरचे १० वायरचे बंडल (किंमत ₹९,३५०) चोरीला गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५(अ), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने दोन तपास पथके तयार केली. गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपी सुंदरसिंग सुकुसिंग राजपूत (वय ३५ वर्ष, रा. लोधी मोहल्ला, जालना याला ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून त्याच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेघबीरसिंग संधु, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. जे.बी. शेवाळे, पोहेकॉ/सचिन चौधरी, सदा राठोड, धनाजी कावळे, अकील पटेल, पोकॉ/मतीन शेख, दिलीप गायकवाड आणि संदीप चव्हाण यांच्या पथकाने केली आहे.











Latur page 4_Layout 1 11/7/2026 2:11 AM Page 1

महाराष्ट्रातील निर्भिड दैनिक

जगमित्र

संतोष सोनवणे (लातूर जिल्हा प्रतिनिधी)
मो.9673158719

PRGI.No.- MHMAR/26/A2511

लातूर जिल्हा आवृत्ती — शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ — पान नं. ४



लातूरमध्ये दिवाळीच्या पूर्वसंध्येला शेतकरी कुटुंबांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश

सावकाराने बळकावलेल्या जमिनी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते शेतकऱ्यांना परत

अवैध सावकारीविरोधात लातूर जिल्हा प्रशासनाकडून मोहिम; वैध सावकाराच्या व्यवहाराचीही होणार तपासणी



लातूर, दि. ०६ : शेतकऱ्यांची आर्थिक विवंचना आणि अज्ञानाचा गैरफायदा घेऊन अवैध सावकारांनी बळकावलेल्या जमिनी मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांना परत मिळाल्या आहेत. राज्य शासनाच्या सहकार विभाग आणि लातूर जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या कठोर निर्णयामुळे दोन शेतकऱ्यांना दिवाळीच्या पूर्वसंध्येला त्यांच्या हक्काची जमीन मिळाली असून, यामुळे या कुटुंबांची दिवाळी खऱ्या अर्थाने आनंदमय झाली आहे.

लातूर जिल्ह्यात जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार विभागाकडून बेकायदेशीर खासगी सावकारीविरुद्ध धडक मोहीम राबवली जात आहे. या अंतर्गत महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १८ (२) मधील कायदेशीर तरतुदींचा प्रभावी वापर करत जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी दोन महत्त्वपूर्ण प्रकरणांमध्ये सावकारीसाठी करण्यात आलेली बेकायदेशीर खरेदीखते रद्द ठरवली होती.

चाकूर तालुक्यातील कलकोटी येथील मंडुबाई इराप्पा डावरे यांनी मुलीच्या लग्नासाठी स्थानिक सावकार किसन गोविंद अलमले यांच्याकडून व्याजाने कर्ज घेतले होते. या कर्जाच्या सुरक्षेची हमी म्हणून सावकाराने त्यांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेत शेतजमिनीचे खरेदीखत करून घेतले होते. सहकार विभागाच्या चौकशीत हा व्यवहार खरेदी-विक्रीचा नसून सावकारी कर्जासाठी घेतलेली हमी असल्याचे सिद्ध झाले. याबाबत चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून, या निर्णयामुळे श्रीमती मंडुबाई यांना त्यांची १ हेक्टर ८० आर जमीन परत देण्यात आली आहे.

आर्थिक अडचणींमुळे निलंगा तालुक्यातील थोर माकणी येथील वामन श्रीपती सूर्यवंशी यांनी सावकार शरद दिगंबर पाटील यांच्याकडून कर्ज घेतले होते. सावकाराने त्यांच्या ४० आर जमिनीची हमी लिहून घेत ती स्वतःच्या व नंतर इतर व्यक्तीच्या नावावर करून घेतली होती. जिल्हा उपनिबंधकांच्या चौकशीत हा व्यवहारही बेकायदेशीर सावकारीसाठी झाल्याचे पुराव्यांवरून सिद्ध झाले असून त्यांनाही त्यांची जमीन कायदेशीररीत्या परत मिळाली आहे.लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड आणि जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या हस्ते गुरुवारी संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा हस्तांतरित करत सातबारा सुपूर्द करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले उपस्थित होते.

अवैध सावकारी विरोधात कठोर बडगा; ८ अवैध सावकारांवर गुन्हे दाखल

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील कलम १८ नुसार, सहकार निबंधकांना सावकारी व्यवहारातून बळकावलेली मालमत्ता शोधून ती मूळ मालकाला परत मिळवून देण्याचे विशेष अधिकार आहेत. या अधिकाराचा वापर करून जिल्हा उपनिबंधकांनी अशी खरेदीखते रद्द केली आहेत. तसेच, अवैध सावकारी करणाऱ्या आठ व्यक्तींविरुद्ध सहकार विभागामार्फत कलम ३९ अन्वये विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्यात बालुरे पिराजी बाबुराव (रा. संतोषी माता नगर, उदगीर), औसा पोलीस स्टेशन येथे आदिल मदारसाब शेख (रा. खोरे गल्ली) आणि फारुक उस्मानसाब सय्यद (रा. आलमपूरा) यांच्याविरुद्ध, तर मुरुड पोलीस स्टेशन अंतर्गत सौरभ अशोककुमार गर्ग (रा. हत्ते नगर, लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तसेच निलंगा पोलीस स्टेशन येथे तुकाराम इस्माईल वजनम (रा. निलंगा) यांच्याविरुद्ध आणि लातूर येथील शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे बिबीता ऊर्फ कविता बालाजी शिंदे (रा. खाडगाव रोड, लातूर) यांच्याविरुद्ध, तसेच काशिनाथ हणमंतराव म्हेत्रे (रा. नाईक चौक, लातूर), संतोष रावसाहेब उपाडे (बार्शी रोड, लातूर), तर विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात पांडुरंग सिद्राम सूर्यवंशी (जुना बाभळगाव रोड, लातूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अवैध सावकारीबाबत प्राप्त तक्रारीनंतर टाकलेल्या धाडीत मिळालेल्या प्रथमदर्शी पुराव्यांमुळे ही कार्यवाही करण्यात आली आहे. अवैध सावकारी विरोधात जिल्ह्यात १४५ तक्रारी प्राप्त झाल्या असून आजपर्यंत ६६ प्रकरणांत चौकशी पूर्ण झाली आहे. त्यापैकी १४ प्रकरणात तथ्य आढळून आले असून ८ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. उर्वरीत तक्रारींविषयी पुढील कार्यवाही गतीने सुरू आहे.

अवैध सावकारीविरोधात तक्रार नोंदवा; जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

शेतकऱ्यांच्या अशिक्षितपणाचा किंवा आर्थिक विवंचनेचा गैरफायदा घेऊन जमीन खरेदीखताद्वारे लिहून घेणे हा कायद्याने गुन्हेगारी स्वरूपाचा बेकायदेशीर सावकारी व्यवहार आहे. कोणत्याही शेतकऱ्याची अशी फसवणूक झाली असल्यास, त्यांनी न घाबरता थेट सहकार विभागाकडे तक्रार दाखल करावी. पीडित शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासन आणि प्रशासन कटिबद्ध आहे, असे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी सांगितले. यापुढेही अवैध सावकारी विरोधात प्राप्त तक्रारींवर तातडीने कार्यवाही करून दोषींवर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

परवानाधारक सावकारांच्या व्यवहारांचीही होणार तपासणी

अवैध सावकारी विरोधात जिल्हा प्रशासनाने मोहीम तीव्र केली आहे. यासोबतच परवानाधारक सावकारांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होवू नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व ३७३ परवानाधारक सावकारांच्या व्यवहारांची तपासणी करण्यात येणार आहे. या सावकारांनी ३५३४ जणांना १९ कोटी ७१ लाख रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. नियमबाह्य पद्धतीने होणाऱ्या सावकारीला पायबंद घालण्यासाठीतातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या आहेत. तसेच सर्व परवानाधारक सावकारांकडून करण्यात आलेल्या कर्ज वितरणाची पडताळणी करून याबाबतचा अहवाल तातडीने सादर करावा, असे त्यांनी म्हटले आहे.

रस्त्यावरील अतिक्रमण काढा? अन्यथा रस्ताच बंद करण्याचा ग्रामस्थांचा धडाकेबाज निर्णय...

औसा: औसा तालुक्यातील भादा येथे रस्त्यावर अतिक्रमण केल्याने ग्रामस्थांनी ग्रामपंचायत भादा कडे प्रशासक आणि ग्रामपंचायत अधिकारी यांच्याकडे सदरील रस्त्यावरील अतिक्रमण काढा अन्यथा आम्ही तो रस्ता पूर्णपणे बंद करणार? असे निवेदन देण्यात आले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की भादा येथील मुख्य चौकापासून ग्रामपंचायत ते जुने पूर्वमुखी हनुमान मंदिर यादरम्यान बब्रूवान नारायण शिवलकर यांचे घर येथे त्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्याचे निवेदन या गल्लीतील सामाजिक कार्यकर्ते प्रशांत पाटील यांच्यासह काही दक्ष नागरिकांनी ग्रामपंचायत कडे देण्यात आले आहे ते अतिक्रमण त्वरित काढा अन्यथा हा पूर्णच रस्ता आम्ही बंद करणार असे निवेदनात इशारा देण्यात आला आहे.

फुलोरा स्कूलच्या विद्यार्थ्यांचा कराटे क्षेत्रात गौरव; विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा सत्कार!



लातूर/संतोष सोनवणे

इंटरनॅशनल फुनाकोशी शोटोकान कराटे असोसिएशनच्या वतीने बेल्ट वितरण समारंभ तसेच विभागीय कराटे स्पर्धेसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी फुलोरा स्कूल, लातूरच्या विद्यार्थ्यांनी कराटे क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. फुलोरा स्कूलच्या मुख्याध्यापिका सावंत मॅडम यांच्या हस्ते प्रगती जाधव, साक्षी मगर, जानवी पारगावे, हर्ष आकडे आणि शाबाज सय्यद या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका सावंत मॅडम म्हणाल्या की, आजच्या काळात कराटे ही केवळ एक क्रीडा कला नसून स्वसंरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही प्रावीण्य मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या पद्धतीने लातूर पॅटर्नने शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, त्याचप्रमाणे लातूरचा कराटे पॅटर्नही विकसित झाला पाहिजे. येथील खेळाडूंनी राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर लातूरचे नाव लौकिक करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीला नवी दिशा मिळत असून, त्यांच्या पुढील स्पर्धांसाठी उपस्थितांनी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला असोसिएशनचे अध्यक्ष शिहान आजमीर शेख, सेन्सई विशद कांबळे, रेहान शेख, रेश्मा सूर्यवंशी, रहीम शेख आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे फुलोरा स्कूलच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या पुढील वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कन्यारत्नाच्या आगमनाचा आनंद कीर्तन सोहळ्यातून होणार साजरा!


नितीन मायंदे यांचा स्त्रीजन्माचा गौरव करणारा स्तुत्य उपक्रम

लातूर/प्रतिनिधी

मुलगा-मुलगी असा भेद न करता मुलीच्या जन्माचेही तितक्याच उत्साहात स्वागत व्हावे, हा सामाजिक संदेश देत निवळी येथील नितीन बापू मायंदे यांनी आपल्या पहिल्या कन्यारत्नाच्या आगमनाचा आनंद अनोख्या पद्धतीने साजरा करण्याचे ठरविले आहे. यानिमित्त मंगळवार (दि १०) रोजी संध्याकाळी ८ वाजता गावातील श्री निळकंठेश्वर मंदिरात ह.भ.प. साध्वी सोनाली दीदी करपे यांच्या सुश्राव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

दिव्या नितीन बापू मायंदे यांना सांप्रदायिक क्षेत्राची विशेष आवड असून, श्री निळकंठेश्वर महादेवावर त्यांची अपार श्रद्धा आहे. धार्मिक आणि आध्यात्मिक विचारांचा प्रसार व्हावा, समाजात भक्तिभाव, संस्कार व सद्विचारांची रुजवण व्हावी, यासाठी ते नेहमीच प्रयत्नशील असतात. मंदिरातील धार्मिक उपक्रमांसह कीर्तन-भजन सोहळ्यांना प्रोत्साहन देण्यात त्यांचा पुढाकार असतो. पहिल्या कन्यारत्नाच्या आगमनाचा आनंदही त्यांनी धार्मिक व भक्तिमय वातावरणात साजरा करण्याचा निर्णय घेतला. मुलगी म्हणजे ओझे नसून ती कुटुंबाचा आनंद, अभिमान आणि भविष्य आहे. तिच्या जन्माचे स्वागत उत्सवाच्या स्वरूपात व्हावे, ही भावना आहे.मुलीच्या जन्माचा अभिमान बाळगण्याची गरज! आजही काही ठिकाणी मुलगा-मुलगी असा भेदभाव केला जात असताना मायंदे कुटुंबाने कृतीतून दिलेला हा संदेश निश्चितच प्रेरणादायी आहे. मुलीच्या जन्माचा आनंद कीर्तनाच्या माध्यमातून साजरा करण्याचा हा उपक्रम समाजात स्त्रीजन्माबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा ठरणार आहे.









महाराष्ट्रातील आघाडीचे दैनिक

जगमित्र

संगिता काळे (धाराशिव जिल्हा प्रतिनिधी)
मो.9588601740 PRGI.NO.MHMAR/26/A0224

धाराशिव जिल्हा आवृत्ती | शनिवार दि.०७ नोव्हेंबर २०२६ | पान नं. ५

आता संभाजी नगर, पुणे, मुंबई येथे जाण्याची गरज नाही

मुळव्याध : संडासच्या जागी आग होणे, दुखणे, कोंब येणे, रक्त जाणे, जागा लहान होणे, फिशर
सांधेदुखी : पाठीच्या मणक्याचे त्रास, चमक मारणे, गॅप पडणे, गुडघे दुखी, टाचदुखी, मानपाठ, कंबरदुखी, हातपायाला मुंग्या येणे, नस दबणे, डोकेदुखी, अंग दुखणे,
स्त्रीयांचे सर्व आजार : मुल बाळ होत नसल्यास वजन जास्त असणे, केस गळणे, चक्करयेणे, घबराहट, बैचेनी, झोप न येणे, पचनाचे व पित्ताचे त्रास, पोटदुखी, हाडीताप, मुतखडा, त्वचारोग, ॲलर्जि सर्दी, खोकला, दमा.

रविवारी दवाखाना बंद राहील

डॉ.रविंद्र ईटके
आयुर्वेद व पंचवर्ग तज्ञ (पुणे)

डॉ.सौ.भाग्यश्री ईटके
स्त्रीरोग व आयुर्वेद तज्ञ

वेळ : स. ११ ते २.३० संध्या : ६ ते ८
सोनोग्राफी सेंटर समोर पदमावती गल्ली, परळी. वै
मो.9822816010, 7588596838

विश्वश्री : आयुर्वेद हॉस्पिटल व पंचकर्म केंद्र

दुष्काळग्रस्त धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना मदतीचा दिलासा

धाराशिव/जिमाका

पावसाने ओढ दिल्याने शेतातील उभी पिके करपली,उत्पादनाची आशा मावळली आणि वर्षभराच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला.अशा कठीण परिस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा आधार मिळू लागला आहे.राज्य शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या मदत वितरण अहवालानुसार जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील ३ लाख ४७ हजार ७२ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे. जिल्ह्यातील एकूण ६ लाख ६२ हजार ७२३ नोंदींपैकी तहसील स्तरावर ५ लाख ८४ हजार ७२ प्रकरणांना,तर जिल्हाधिकारी स्तरावर ५ लाख ६५ हजार १४७ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे.

यंदा अपुऱ्या पावसामुळे जिल्ह्यात गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे.पिकांच्या नुकसानीबरोबरच पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा,शेतीवरील खर्च आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभे ठाकले आहेत.या पार्श्वभूमीवर शासनाकडून करण्यात येत असलेले मदतीचे वितरण संकटग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे.

जिल्ह्याची तालुकानिहाय स्थिती

मदत व पुनर्वसन विभागाच्या ६ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या अहवालानुसार भूम तालुक्यात एकूण १ लाख २ हजार २८२ नोंदी असून,तहसील स्तरावर ८३ हजार ४४९ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली आहे.१८ हजार ३६८ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत.जिल्हाधिकारी स्तरावर ८३ हजार ४४८ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,४० हजार ७२९ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण झाले आहे. धाराशिव तालुक्यात एकूण १ लाख १३ हजार ३५ नोंदी असून, तहसील स्तरावर ८९ हजार १३६ प्रकरणांना मंजुरी,तर २३ हजार २४ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी स्तरावर ८८ हजार ३३२ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,६२ हजार ३७३ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे. कळंब तालुक्यात एकूण १ लाख ५ हजार ८६० नोंदी असून,तहसील स्तरावर ८७ हजार ७५९ प्रकरणांना मंजुरी,तर १८ हजार १०१ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी स्तरावर ८७ हजार ७५९ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,५१ हजार ६८९ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण झाले आहे. लोहारा तालुक्यात एकूण २५ हजार २६ नोंदी असून,तहसील स्तरावर २२ हजार ३२५ प्रकरणांना मंजुरी,तर २ हजार ७०१ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी स्तरावर २२ हजार ३१२ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,१५ हजार ३२० शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे. उमरगा तालुक्यात एकूण ७३ हजार १६९ नोंदी असून,तहसील स्तरावर ६८ हजार ९५१ प्रकरणांना मंजुरी,तर ४ हजार २१८ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी स्तरावर ६८ हजार ५४० प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,४८ हजार ७७६ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे. परांडा तालुक्यात एकूण ७३ हजार ९२७ नोंदी असून,तहसील स्तरावर ६५ हजार ७५७ प्रकरणांना मंजुरी, तर ८ हजार १५५ प्रकरणे नामंजुर करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी स्तरावर ६५ हजार ७५७ प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,४२ हजार ६०० शेतकऱ्यांना मदतीचे वितरण झाले आहे. तुळजापूर तालुक्यात एकूण ९९ हजार २३८ नोंदी असून,तहसील स्तरावर ९७ हजार ८१९ प्रकरणांना मंजुरी,तर १ हजार ४१९ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.जिल्हाधिकारी स्तरावर ८२ हजार ७७० प्रकरणांना मंजुरी मिळाली असून,५८ हजार ९७४ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे. वाशी तालुक्यात एकूण ७० हजार १८६ नोंदी असून,तहसील स्तरावर ६८ हजार ८७६ प्रकरणांना मंजुरी, तर १ हजार ३१० प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी स्तरावर ६६ हजार २२९ प्रकरणांना मंजुरी,तर २ हजार ६४७ प्रकरणांना नामंजुरी देण्यात आली आहे.या तालुक्यातील २६ हजार ६११ शेतकऱ्यांना मदतीचे वितरण झाले आहे.

५ लाख ६५ हजारांहून अधिक प्रकरणांना जिल्हाधिकारी स्तरावर मंजुरी

जिल्ह्यातील एकूण ६ लाख ६२ हजार ७२३ नोंदींपैकी तहसील स्तरावर ५ लाख ८४ हजार ७२ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून,तहसील स्तरावर ७७ हजार २९६ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत.जिल्हाधिकारी स्तरावर ५ लाख ६५ हजार १४७ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून,२ हजार ६४७ प्रकरणे नामंजूर करण्यात आली आहेत. आतापर्यंत ३ लाख ४७ हजार ७२ स्वतंत्र शेतकऱ्यांना मदतीचे वितरण करण्यात आले आहे.

पाच हजार रुपयांची अग्रिम मदत; दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक आधार

राज्य शासनाच्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील ३०४ दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांची दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी तातडीचा आर्थिक दिलासा मिळावा,हा या निर्णयामागील उद्देश आहे.ही मदत थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा करण्यात येत आहे.

आधार प्रमाणीकरण महत्त्वाचे

शासनाच्या मदत वितरण प्रक्रियेनुसार पात्र लाभार्थ्यांची माहिती तपासल्यानंतर विशिष्ट क्रमांक तयार करण्यात येतो. त्यानंतर आवश्यक ई-केवायसी व आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया पूर्ण करून आधार संलग्न बँक खात्यात मदत जमा करण्यात येते. ही प्रक्रिया शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे मोफत असून,मदतीसंदर्भातील अडचणींसाठी संबंधित तहसील कार्यालयाशी संपर्क साधता येतो. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकरी कुटुंबांसाठी ही मदत दिलासादायक ठरत आहे. शेतीतील उत्पन्न घटल्याने सणासुदीचा खर्च,मुलांच्या गरजा आणि दैनंदिन संसाराचा गाडा चालविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे.अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारी अग्रिम मदत ही तात्पुरता आर्थिक आधार देणारी ठरत आहे.

खोरस येथे उज्वला योजनेच्या गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट

आगीत संसारोपयोगी साहित्य व ७ ते ८ क्विंटल कापूस जळून खाक!

पालम/प्रतिनिधी

पालम ता. , जि. परभणी तालुक्यातील मौजे खोरस येथील शेतात राहणाऱ्या लालबी नबी सय्यद यांच्या राहत्या घरी गॅस सिलिंडरचा अचानक स्फोट झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. रात्रीच्या वेळी घडलेल्या या भीषण दुर्घटनेत त्यांचे सर्व संसारोपयोगी साहित्य आणि शेतातून वेचून साठवून ठेवलेला अंदाजे ७ ते ८ क्विंटल कापूस आगीत पूर्णपणे जळून खाक झाला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे



घटनेची सविस्तर माहिती:लालबी नबी सय्यद या खोरस येथील आपल्या शेतातील वस्तीवर वास्तव्यास असून, त्या घरी एचपी कंपनीच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतील गॅस सिलिंडरचा वापर करत होत्या. दरम्यान, रात्रीच्या सुमारास अचानक गॅस गळती होऊन आगीने उग्र रूप धारण केले आणि गॅस सिलिंडरचा खूप मोठा स्फोट झाला. या स्फोटाची तीव्रता इतनी प्रचंड होती की, काही क्षणातच आगीने संपूर्ण घर आणि घरातील साहित्य आपल्या वेत घेतले.

नुकसानीचा तपशील:

संसारोपयोगी वस्तू खाक: घरात असलेले अन्नधान्य, कपडे, भांडी आणि इतर सर्व महत्त्वाचे साहित्य जळून राख झाले आहे. कापसाचे मोठे नुकसान. शेतात कष्टाने वेचून घरात साठवून ठेवलेला तब्बल ७ ते ८ क्विंटल कापूस आगीच्या भस्थानी पडल्याने शेतकरी कुटुंबाचे अतोनात नुकसान झाले आहे. सुदैवाने वेळीच सावध झाल्यामुळे किंवा दैव बलवत्तर म्हणून कोणतीही जीवितहानी टळली, नाहीतर मोठा अनर्थ ओढवला असता. या दुर्दैवी घटनेमुळे लालबी सय्यद यांचे कुटुंब उघड्यावर आले असून, शासनाकडून तातडीने पंचनामा करून योग्य ती आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

श्री श्री गुरुकुलमध्ये पाणी बचत व फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प; एक हजार विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

अणदूर/प्रतिनिधी

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील श्री श्री गुरुकुलमध्ये दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर पाणी बचतीचे महत्त्व आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी 'पाणी बचत व फटाकेमुक्त दिवाळी' अभियान राबविण्यात आले. यावेळी शाळेतील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी पाणी बचत करण्यासह फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेतली.



यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा जिल्हा परिषद सदस्य डॉ जितेंद्र कानडे,सचिव डॉनागनाथ कुंभार ,बाळकृष्ण घोडके-पाटील,बालाजी घुगे,डॉ.हरिदास मुंडे,लक्ष्मण नरे , शिवराज भुजबळ यांची उपस्थिती होती.

दिवाळी हा आनंदाचा आणि प्रकाशाचा सण असून, तो पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे ही काळाची गरज आहे. पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचे महत्त्व जाणून घेणे, ध्वनी व वायुप्रदूषण रोखणे तसेच पर्यावरणाचे संरक्षण करणे याबाबत जिल्हा परिषद सदस्य डॉ जितेंद्र कानडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यंदाच्या दिवाळीत शाळेच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांना आणि परिसरातील नागरिकांनाही पाणी बचत व फटाकेमुक्त दिवाळीचा संदेश देण्याचा संकल्प केला आहे. यासाठी शाळेमध्ये पर्यावरण पूरक आकाशकंदील, माती पासून पणती, व झाडांची पाले व फुलांपासून तोरण बनवणे अशी कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी शाळेतील हजार विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरणाविषयी प्रेम आणि निसर्ग संवर्धनाची जबाबदारी निर्माण करण्याचा प्रयत्न श्री श्री गुरुकुलच्या वतीने करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक फराळ व सामूहिक दीप उत्सव साजरा करून दिवाळी सणाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी विभाग प्रमुख भाग्यश्री गोरे,अबोली वाघमारे, नागिनी हत्ते ,मयुरी कुलकर्णी,मंजुषा जोशी, भाग्यश्री जमदाडे, अर्जुन माशाळकर, दीप्ती नरवडे,रेखा जाधव, गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

घरकुलासाठी पहीला धनादेश मिळाल्याने यंदा संबधीत कुटूंबासाठी आठवणीतील दिवाळी भेट

पाथरी/आवडाजी ढवळे

पाथरी नगर परिषद कार्यक्षेत्रातील गरजु ४८ कुटूंबास प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ मंजुर झाल्याने पहिला हाप्ताचा एक लाख रुपयाचे धनादेश मिळाल्याने संबधीत कुटुंबासाठी यंदाची दिवाळी आठवणीत राहनार आसल्याने त्यांच्या चहऱ्यावर आनंदी आनंद दिसुन येत होता



सविस्तर वृत्त आसे कि शासनाच्या वतीने देशातील गरजु नागरीकांचे आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल दिले जात आहेत याच योजने च्या माध्यमातुन पाथरी शहरातील १२०० कुटूंबास घरकुल मंजुर झाले त्या पैकी ४८ घरकुल लार्भाती कुटूंबास आ.सईद खान यांच्या पुढाकाराने पाथरी नगरीचे नगर अध्यक्ष आशेफ खान व मुख्यधिकारी काकासाहेब डोईफोडे यांच्या हास्ते दि.०५/११/२०२६ रोजी नगर परिषद कार्यलयातील सभागृहात पहीला हाप्ता म्हणुन प्रतेकी एक लाख रुपयाचे धनादेश वाटप करण्यात आले आहे या प्रसंगी पाथरी नगर परिषदेचे उपध्यक्ष अलोक चौधरी,नगर सेवक उध्दव नाईक,अनिल ढवळे,खालेद चाऊस,गोविंद हारकळ,साजिद राज आदी उपस्थीत होते

सदरील कुटूंबास दिवाळी सणा वेळी घरकुल योजनेचा पहील्या हाप्त्याचा धनादेश मिळाल्याने यंदाची दिवाळी संबधीत कुटुंबासाठी कायम आठवणीत राहनार आसल्याने त्यांच्या चहऱ्यावर आनंदी आनंद दिसुन येत होता.

वैजनाथ प्रतिष्ठान पुणे यांच्या तर्फे राबविण्यात आला अनोखा उपक्रम



परळी (प्रतिनिधी) दिवाळीचा पहिला दिवा वैजनाथ प्रतिष्ठान पुणे यांच्यातर्फे राबविण्यात आला अनोखा उपक्रम. परळीतील पुण्यात राहणारा मित्रपरिवार यांच्या तर्फे वैद्यनाथ प्रतिष्ठान पुणे च्या माध्यमातून विकास अनाथ आश्रम चिखली येथे दिवाळी निमित्त फराळ फटाके आकाश कंदील व दिवे वितरण करण्यात आले. यावेळी संकेत वाघमारे, चेतन शिंदे , वैभव फड ,राहुल गाढवे, गणेश गित्ते ,महेश चौधरी ,सर्वेश सरौदे ,प्रवीण कांबळे ओमकार गायकवाड, अशोक जाधव, शेख शरीफ, निवृत्ती केंद्रे प्रमोद मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक बांधिलकी जपत शिक्षिकेचा स्तुत्य उपक्रम; १०० निराधारांची दिवाळी झाली गोड!

अणदूर/प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी आणि माणुसकी जपण्याचे उत्तम उदाहरण फुलवाडी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका चौधरी (अवताडे) वंदना श्रीपती यांनी घालून दिले आहे. गेल्या सात वर्षांपासून त्या दरवर्षी दिवाळीनिमित्त तब्बल १०० गरीब, गरजू व निराधार व्यक्तींना दिवाळीचा फराळ वाटप करून त्यांच्या जीवनात आनंदाची गोडी निर्माण करीत आहेत. कोरोना महामारीच्या कठीण काळात अणदूर येथे साहेबराव घुगे मित्र मंडळाच्या वतीने सलग चार महिने गोरगरीब व निराधार नागरिकांसाठी घरपोच जेवण अभियान राबविण्यात आले होते. कोरोनाची महामारी आपण सगळ्यांनी अनुभवली आहे अजूनही तो काळ समोर आला की मन सुन्न व दसका बसतो.आप, आपलं प्राण वाचावेत यासाठी प्रत्येकाच्या जीवाची धडपड पाहिली, अनुभवली आहे. अभियानातील निराधार मंडळींना शिक्षिका



चौधरी (अवताडे) यांनी एक दिवसाची सेवा देऊन सामाजिक कार्यात आपला सहभाग नोंदविला. याच सेवाभावातून सुरू झालेली माणुसकीची नाळ आजही त्यांनी जपली आहे.

दरवर्षी दिवाळीच्या सणाला याच अभियानातील व अन्य. १०० गरीब ,निराधार कुटुंबांपर्यंत फराळ पोहोचवून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे काम त्या सातत्याने करीत आहेत. स्वतःच्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेणारी ही कृती खऱ्या अर्थाने माणुसकीचा दीप उजळवणारी आहे.

एक दीप गरजू शेताऱ्यांसाठी उपक्रमांतर्गत रासेयोच्या वतीने अंजनडोह येथे किराणा किट वाटप

धारूर/अतुल शिनगारे

येथील मराठवाडा शिक्षणप्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एक दीप गरजू शेतकऱ्यांसाठी या उपक्रमांतर्गत मौजे अंजनडोह येथे दीपावली किराणा किट व शैक्षणिक साहित्य वही व पेन विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यामध्ये गयाबाई निवृत्ती चोपडे, पर्याग बाई संभाजी गायके, पार्वती अंकुश झुंजुर्डे, चंद्रकला साहेबराव लोखंडे, श्रीमती रेपे शेतीतील गोठा जळीत कुटुंब रेपेवाडी, संजय गुरव, लोखंडे मामा यांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.



तसेच गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वही व पेन या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.याप्रसंगी सरपंच प्रमोद सोळुंके, प्रा. संजय साळुंखे, प्रा. महादेव गायके, उपसरपंच प्रकाश सोळंके, रामदास कांबळे, प्रा राम नांदुरे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला वर्गांची उपस्थिती होती.यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव यांची उपस्थिती होती. या उपक्रमाबद्दल राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागाचे अभिनंदन प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. धनराज सोळंके यांनी अभिनंदन केले. तसेच राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने राबवलेल्या या उपक्रमाबद्दल समाजातील सर्व स्तरातून महाविद्यालयाने समाजाप्रती बांधिलकी जोपसल्या बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. उपक्रम हा महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या आर्थिक सहभागातून ही योजना राबविण्यात आली.



बरकत नगरच्या विकासकामांना गती; दोन कोटींच्या निधीतून रस्ते व नाल्यांची कामे पूर्णत्वास!

मिलिंद नगरची देखील १ कोटी ८७ लक्ष रुपयांची विकासकामे प्रगतीपथावर!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी

नगर परिषदेच्या जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत बरकतनगर आणि मिलिंद नगर येथील अविकसित भागाच्या विकासासाठी अनुक्रमे तब्बल २ कोटी व १ कोटी ८७ लक्ष रुपयांच्या निधीतून रस्ते व नाल्यांची विकासकामे मंजूर करून काही महिन्यांपूर्वी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते.यापैकी बरकतनगर ची कामे पूर्णत्वास गेली असून मिलिंद नगरची विकास कामे प्रगतिपथावर आहेत.

आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाईची परिस्थिती लक्षात घेता,प्रशासनाकडून सिमेंट काँक्रिट रस्ते व नाल्यांची कामे थांबविण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सुरू असलेल्या कामांची गती, गुणवत्ता आणि प्रत्यक्ष स्थिती जाणून घेण्यासाठी आज बरकतनगर येथे प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

लवकरच लोकार्पण सोहळा..!!

राज्याचे माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब आणि राज्याच्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे साहेब यांच्या सहकार्यामुळेच या विकासकामांसाठी निधी उपलब्ध झाला आहे.

विशेष म्हणजे,या कामांच्या सुरुवात होताना भूमिपूजन करण्यासाठी नगराध्यक्षा उपनगराध्यक्षा,बांधकाम सभापती तसेच स्थानिक नेते व सामाजिक कार्यकर्ते व सहकाऱ्यांना निमंत्रित करण्यात आले नव्हते.मात्र, राजकारणापेक्षा विकासाला प्राधान्य देत या भागातील कामे पूर्णत्वास नेण्याची आमची भूमिका कायम होती आणि असणार आहे...

लवकरच जिल्हा वार्षिक योजनेतून पूर्ण झालेल्या विकासकामांचा लोकार्पण सोहळा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे साहेब आणि ना. पंकजाताई मुंडे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्याच्या दृष्टीने आज विकासकामांची तसेच सोहळ्याच्या मार्गाची पाहणी केली.आनंदाची बाब म्हणजे याच भागात नागरिकांच्या सुविधेसाठी दवाखाना उभारण्याच्या प्रस्तावित जागेचीही पाहणी केली.

नगर परिषद निवडणुकीत आमचे दोन्ही नगरसेवक अल्प मतांनी पराभूत झाले असले, तरी या भागातील नागरिकांना दिलेला विकासाचा शब्द आम्ही विसरलेलो नाही.पद असो वा नसो,नागरिकांच्या प्रश्नांसाठी आणि भागाच्या विकासासाठी आमचा पाठपुरावा सुरूच राहील, हीच आमची भूमिका आहे.

या वेळी नागरिकांनी विकासकामांबाबत समाधान व्यक्त केले.आ.धनंजय मुंडे साहेब आणि ना.पंकजाताई मुंडे साहेब यांच्या सहकार्यामुळे आपल्या भागात विकासकामे होत असल्याचा आनंदही त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी माझ्यासह (पान २ वर)

कापडी पिशव्यांच्या वाटपातून प्लास्टिकमुक्तीचा जागर; हनुमान चौकात स्तुत्य उपक्रम

दिवाळीत माहेश्वरी महिला मंडळाची पर्यावरणाला अनोखी भेट!

धारूर/अतूल शिनगारे



दिवाळीच्या सणात पर्यावरणाचे भान जपत माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने किल्ले धारूर शहरातील हनुमान चौक परिसरात नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. या काळात प्लास्टिक पिशव्यांचा वापर वाढत असल्याने पर्यावरणाच्या प्रदूषणात भर पडते. प्लास्टिकमुळे होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने माहेश्वरी महिला मंडळाने हा उपक्रम राबविला.मंडळाच्या महिला सदस्यांनी बाजारपेठेत नागरिकांना कापडी पिशव्यांचे वितरण केले. तसेच दैनंदिन खरेदीसाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान द्यावे, असा संदेशही यावेळी देण्यात आला.या उपक्रमात मंडळाच्या अध्यक्षा सौ. नितल तोष्णीवाल, सचिव सौ. शितल तोष्णीवाल, सौ. शोभा तोष्णीवाल, सौ. आशा तोष्णीवाल, सौ. मीना तोष्णीवाल, सौ. संगीता सिकची, सौ. वैशाली मंत्री, (पान २ वर)



दुष्काळी सावटात शेतकरी शेतमजूर कुटुंबांवर रेशन बंदीची कुऱ्हाड!

मुलांच्या नोकरीची शिक्षा वृद्ध आई-वडिलांना देऊ नका-जे.डी.शाह

बीड/प्रतिनिधी

राज्यात एकीकडे दुष्काळाचे सावट गडद होत असताना दुसरीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शेतात काम नाही, हाताला रोजगार नाही आणि वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. अशा गंभीर परिस्थितीत ऐन दिवाळीच्या काळात पात्र शिधापत्रिकाधारकांचे रेशन धान्य बंद करण्यात आल्याने गरीब आणि शेतकरी कुटुंबांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. त्यामुळे दुष्काळी सावटात रेशन बंदीचा घाव; गरिबांच्या ताटातील घास हिरावण्याचा प्रकार म्हणजे दुष्काळात तेरावा महिना! अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

शेतकरी उत्पादक कंपनीचे संचालक असणे किंवा आयकर विवरणपत्र (इन्कम टॅक्स रिटर्न) भरलेले असणे, या कारणांवरून बीड जिल्ह्यात एकूण २६ हजार ४४ लाभार्थ्यांचे रेशन धान्य बंद करण्यात आल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, कुटुंबातील मुलगा किंवा मुलगी खासगी कंपनीत नोकरीला लागली, त्यांनी आयकर विवरणपत्र भरले, म्हणून त्यांच्या वृद्ध आई-वडिलांच्या ताटातील धान्यही बंद करायचे का? असा सवाल समाजसेवक जे.डी. शाह यांनी ऐका प्रसिद्धीपत्रकाद्वारे उपस्थित केला आहे.

पत्रात पुढे म्हटले आहे की मुलगा खाजगी कंपनीत नोकरी करतो म्हणून वृद्ध आई-वडील श्रीमंत होतात का?

आज ग्रामीण भागातील अनेक शेतकरी (पान २ वर)

दिवाळीच्या अनुषंगाने नगरपरिषदेकडून

कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन आणि महागाई भत्ता अदा!

परळी वैजनाथ/प्रतिनिधी



ना पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगर परिषदेकडून कंत्राटी कर्मचाऱ्यांसह कायमस्वरूपी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन दिवाळीपूर्वीच अदा करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड झाली आहे. नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारल्यापासून कंत्राटीसह सर्वच कर्मचाऱ्यांचे वेतन नियमित करण्यावर भर दिलेला असून दिवाळीच्या अनुषंगानेही दिवाळीपूर्वीच हातात पैसे यावे या दृष्टिकोनातून वेतनाची रक्कम अदा करण्यात आली आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर महिन्याचे ३२ लाख ३४ हजार रुपये वेतन अदा करण्यात आले आहे. तसेच वसुली, अग्निशमन आणि विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचेही वेतन (पान २ वर)



परळी तालुक्यातील सर्व पोलीस पाटील बांधवांच्या शासकीय कामकाजासाठी आणि बैठकांसाठी हक्काचे पोलीस पाटील भवन लवकरात लवकर उभे राहावे, या प्रमुख मागणीचे निवेदन माजी मंत्री मा. नामदार धनंजयजी मुंडे साहेब यांना परळी तालुका पोलीस पाटील संघटनेच्या वतीने सादर करण्यात आले. यासाठी उपस्थित माऊली दादा मुंडे पोलीस पाटील व सर्व पोलीस पाटील आणि सर्व पदाधिकारी उपस्थितीत होते या महत्त्वपूर्ण मागणीवर साहेबांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.





जगमित्र हे पत्र मुद्रक, प्रकाशन, मालक, संपादक बालासाहेब जिजाराम कडबाने यांनी जगमित्र ऑफसेट, बाजीप्रभू नगर जवळ नेहरू चौक परळी वै. ता.परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक जगमित्र कार्यालय, 'जगमित्र' बाजीप्रभू नगर नेहरू चौक (तळ) परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड तर दैनिक जगमित्र कार्यालय घर क्र.२०, खडगाव रोड, क्रांतीनगर, विश्वशांती बौध्द विहार जवळ लातूर घर क्र.२२/२० एसटी कॉलनी, बाशी नाका, धाराशिव तनिश ऑर्किड, फेज-२, आर-विंग, ११०५, आळंदी आरडी., चारोली फाटा, ता. हवेली, पुणे ९-२-३४६, बिलाल नगर, देलगूर नाका, इतवारा नांदेड प्लॉट क्र.६६/२ सीटीएस क्र.९०, मयुरी रेसी, महिंद्रा शोरूमच्या मागे, छ.संभाजीनगर रोड, जालना येथे प्रकाशित केले आहे. (दैनिकातील मजकूर बातम्या बाबत संपादक सहमत असतीलच असे नाही.पीआरबी कायद्यानुसार मजकूर निवडण्याची जबाबदारी यांचेवर राहील.) कार्यकारी संपादक : बिलाल शेख मो.नं.९४२२४०४७४०

'Jagamitra' is printed by Balasaheb Jijaram Kadbane (Printer, Publisher, Owner, and Editor) at Jagamitra Offset, near Nehru Chowk, Bajiprabhu Nagar, Parli Vaijnath (Dist. Beed, Maharashtra). It is published from the following locations: 'Jagamitra' Office, Bajiprabhu Nagar, Nehru Chowk (Ground Floor), Parli Vaijnath 431515, Dist. Beed; House No. 20, Khadgaon Road, Krantinagar, near Vishwashanti Buddha Vihar, Latur; House No. 22/20, ST Colony, Bashi Naka, Dharashiv; Tanish Orchid, Phase-2, R-Wing, 1105, Alandi Road, Charoli Phata, Tal. Haveli, Pune; 9-2-346, Bilal Nagar, Delgur Naka, Itwara, Nanded; and Plot No. 66/2, CTS No. 90, Mayuri Residency, behind Mahindra Showroom, Chh. Sambhajinagar Road, Jalna. (The Editor does not necessarily agree with the content or news published in the daily; the responsibility for content selection rests with the designated person as per the PRB Act.) Executive Editor: Bilal Shaikh (Mobile No. 9422404740).